# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक ३१३ वा शनिवार दि.२५ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB, Racold, legrand, HAVELLS, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


# कोल्हापूरच्या सुपुत्राचा अमेरिकेत डंका; श्रीनिवास कुलकर्णी यांना खगोल शास्त्रातील 'शॉ' पुरस्कार

भारतीय वंशाचे महाराष्ट्राचे सुपुत्र आणि सध्या अमेरिकेत प्राध्यापक असलेले श्रीनिवास आर कुलकर्णी यांना खगोल शास्त्रातील शॉ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'शॉ' हा अमेरिकेत विज्ञान क्षेत्रातील प्रतिष्ठेचा पुरस्कार समजला जातो. श्रीनिवास कुलकर्णी हे अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

'या' संशोधसाठी पुरस्कार मूळचे भारतीय वंशाचे, महाराष्ट्र सुपुत्र अमेरिकन श्रीनिवास आर. कुलकर्णी हे कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे भौतिकशास्त्र, गणित आणि खगोलशास्त्र या विभागांमध्ये प्राध्यापक आहेत. मिलिसेकंद पल्सर, गॅमा-रे बर्स्ट, सुपरनोव्हा आणि इतर परिवर्तनीय किंवा क्षणिक खगोलशास्त्रीय वस्तूंबद्दल कुलकर्णी यांच्या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे त्यांना अमेरिकेतील 'शॉ' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्राध्यापक कुलकर्णी मूळ कोल्हापूरचे



च्या भौतिकशास्त्र विभागावर पोस्ट केलेल्या त्यांच्या बायोनुसार, कुलकर्णी यांचा जन्म महाराष्ट्रातील 'कुरुंदवाड' (जि. ) या गावात झाला. कर्नाटकातील हुबळी येथे त्यांचे शिक्षण झाले आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्लीमधून भौतिकशास्त्रात त्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. त्यानंतर अमेरिकेतील बर्कले विद्यापीठातून त्यांनी पीएचडीचे शिक्षण पूर्ण केले आहे.

## 'लष्कर ए तय्यबा' संघटनेसाठी काम करण्याचे आमिष, धुळ्यात दोघांना अटक

धुळे : अंतरराष्ट्रीय व्हॉटसअप व्हर्चुअल नंबर वरून बनावट कॉल करून दहशतवादी संघटना असणाऱ्या लष्कर ए तय्यबा या संघटनेसाठी काम करण्याचे अमिष देणाऱ्या दोघांना धुळे सायबर पोलीसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे फिर्यादी आणि दोन्ही आरोपी हे चांगल्याच परिचयाचे असल्याचे प्राथमिक तपासातून उघड झाले आहे. मात्र बनावट व्हर्चुअल नंबर घेऊन अशा पद्धतीने दहशतवादी संघटनेचे नाव वापरल्याने धुळ्याचा पोलीस विभाग सतर्क झाला यातून दोनही आरोपींच्या मुस्क्या आवळण्यात आल्या आहे.धुळे येथील चाळीसगाव रोड परिसरातील जिल्हा परभणी मध्ये राहणारे इमरान हारून शेख हे ठाणे येथील जय टायगर सिक्युरिटी एजन्सी साठी काम करतात. ते दिनांक २१ एप्रिल २०२४ रोजी त्यांचे घरी असतांना त्यांना रात्री ०८.१५ वाजता त्यांच्या मोबाईल नंबरवर अंतरराष्ट्रीय कोड असलेला + १ (५६७) ३२८-५२५१ या नंबर वरून व्हॉटसअप कॉल आला. त्यावर अज्ञात इसमाने तो लष्कर ए तय्यबा या अतिरेकी संघटनेतून बोलत असल्याचे सांगून तक्रारदारास आमिष दाखवून फसविण्याचा प्रयत्न केला. यावेळी इमरान याने अशा पद्धतीने देशद्रोह करून नका, असे सांगून दूरध्वनी करणाऱ्याला सुनावले. मात्र कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी इमरान शेख यांनी लागलीच सायबर पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दिला. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सदर प्रकारणाच्या मुळाशी जावून वापरण्यात आलेल्या अंतरराष्ट्रीय व्हर्चुअल नंबरची माहिती काढण्या बाबत सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाला सुचना केल्या.कॉल खरा वाटावा म्हणून तदनंतर सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुरेशकुमार घुसर यांनी या प्रकरणी तांत्रीक विष्लेक्षण व सखोल चौकशी सुरू केली. यात विदेशी वाटावा असा नंबर कशा पद्धतीने घेण्यात आला याची माहिती देखील घुसर यांनी घेतली. या चौकशीमध्ये इमरान शेख याला त्याच्या समवेत संपर्क असणाऱ्या दोघांनी अशा पद्धतीने फोन केल्याची बाब देखील तपासात निदर्शनास आली. फिर्यादीच्या परिचयातील इसम नामे ऋषीकेश नरेंद्र भांडारकर (रा. शनी मंदीरा जवळ, देवपुर, धुळे) यांनेच यातील तक्रारदारास अंतरराष्ट्रीय व्हर्चुअल नंबरच्या माध्यमातून व्हॉटअसप कॉल केल्याचे निष्पन्न झाले. सदर कॉल वरील संभाषण खरे वाटावे यासाठी ऋषीकेश नरेंद्र भांडारकर याचा मित्र नामे खालीद अन्सारी याने फोन वरून हिंदी भाषेत संभाषण करून फिर्यादीची फसवणूक करण्याच्या उद्देशाने कॉल केला असल्याचे समोर आले आहे.

## डोंबिवलीतील दुर्घटनेला कंपनी व्यवस्थापन जबाबदार : अंबादास दानवे

ठाणे : डोंबिवलीतील एमआयडीसी येथील अमूदान कंपनीत रिॲक्टरमध्ये स्फोट होऊन आग लागल्याच्या दुर्घटनेला सर्वस्वी सदर कंपनीचे मॅनेजमेंट जबाबदार आहे. औद्योगिक विभाग कंपन्यांचे ऑडिट करत नसल्यामुळे व त्यांच्या हलगर्जीपणा व अक्षम्य दुर्लक्षपणामुळे वारंवार अपघाताच्या अशा घटना घडतात, असा गंभीर आरोप विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. डोंबिवली येथे अमूदान कंपनीत रिक्टरमध्ये स्फोट होऊन आग लागल्याची मोठी दुर्घटना (गुरुवारी घडली. त्या दुर्घटनास्थळी



आज विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. अधिकारी वर्गाकडून याबाबत आढावा घेतला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.अकुशल कामगार व जुने रिअँक्टर वापरामुळे अशा घटना वारंवार घडतात, त्यामुळे बॉयलर प्रमाणे रिअँक्टरवर धोरण आणावे, अशी मागणी दानवे यांनी केली आहे. याबाबत येत्या अधिवेशनात आवाज उठवणार असल्याचे ते म्हणाले.तसेच या दुर्घटनेत जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांची अंबादास दानवे यांनी एम्स रुग्णालयात भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. महाविकासआघाडी सरकारच्या कार्यकाळात या भागातील पाच विषारी रसायनाच्या कंपन्या शहराबाहेर स्थलांतरीत करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र त्यानंतर आलेल्या युती सरकारने याबाबत कोणतेच पावले उचलली नाहीत. या युती सरकारने अशा अवैधपणे कंपन्या चालविण्यासाठी संरक्षण दिल्याची टीका दानवे यांनी केली.



काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष,करवीर विधानसभा मतदारसंघातील आमदार पी. एन. पाटील यांचे नुकतेच अकस्मित निधन झाले,आज राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कोल्हापुर येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन पाटील कुटुंबीयांची भेट घेतली, राजेश आणि राहुल पाटील व पाटील कुटुंबीयांचे सांत्वन केले,त्यांना धीर दिला.

## माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्या ७९ व्या जयंतीनिमीत्त विलासबाग, बाभळगाव येथे आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन

लातूर / प्रतिनिधी :- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या ७९ जयंतीनिमित्त रवीवार दि. २६, मे २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता , बाभळगाव येथील विलासबागेत सार्वजनिक आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रात मंत्री म्हणून आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांनी असंख्य कल्याणकारी निर्णय घेतले. आपल्या राजकीय कार्यकाळात लोकहित डोळ्यासमोर ठेवून त्यांनी घेतलेले निर्णय ऐतिहासीक ठरले आहेत. राजकारणातले आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून आदरणीय विलासराव देशमुख साहेबांची ओळख आहे. सन १९८० च्या विधानसभा निवडणुकीत लातूर मतदारसंघातून विलासराव देशमुख साहेब निवडून आले आणि राज्यमंत्री, मुख्यमंत्री अशी विलासराव देशमुख साहेब यांची वाटचाल महाराष्ट्राला वाखाणण्याजोगी अशीच होती.महाराष्ट्रातले काँग्रेस पक्षामधील सर्वात लोकप्रिय आणि सर्वात प्रसन्न व्यक्तिमत्व म्हणून विलासराव देशमुख यांचेच नाव घ्यावे लागेल. सामान्य जनतेसाठी व कार्यकर्त्यासाठी साहेब आदर्श लोकप्रतिनिधी आहेत. राज्याच्या विकासाला गती देण्यात मोलाची भूमिका त्यांनी बजावली आहे. राजकारणातले आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून आदरणीय विलासराव देशमुख साहेबांची ओळख राहिली आहे. लोकाभिमुख नेतृत्व आणि प्रसन्न व्यक्तिमत्व म्हणून ते सर्व परिचित होते. अशा लोकविलक्षण अष्टपैलू नेतृत्वाच्या जयंतीनिमित्त दरवर्षी राज्यभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यावर्षी त्यांच्या ७९ व्या जयंतीनिमित्त रविवार दि. २६, मे २०२४ बाभळगाव येथील विलासबाग येथे आयोजित सार्वजनिक जयंती सभेतून त्यांच्या कार्याला स्मरणपूर्वक आदरांजली वाहण्यात येणार



आहे. या सभेसाठी सकाळी सर्वांनी ८.४५ वाजता विलासबाग येथे स्थानापन्न व्हावे अशी अपेक्षा आहे. सकाळी ९.०० वाजता सुप्रसिद्ध सिने पार्श्वगायक गायक मंगेश बोरगावकर व त्यांच्या सहकाऱ्यांकडून शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून भावस्वरांजली हा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर उपस्थित सर्वांनी पुष्पांजली अर्पण केल्यानंतर १०.०० वाजता आदरांजली सभेचा समारोप होईल. या सभेचे सुत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे व सचिन सुर्यवंशी करणार आहेत. या आदरांजली कार्यक्रमास विलासबाग, बाभळगाव येथे जनतेने आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन देशमुख कुटूंबियांच्या वतीने करण्यात आले आहे

# पाणी टंचाई उपाययोजनांचे प्रस्ताव तातडीने निकाली काढा-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

## जिल्ह्यातील पाणी टंचाई उपाययोजनांचा आढावा

लातूर :- पाणी टंचाई निवारण्यासाठी विहिरींचे अधिग्रहण, टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबतचे प्रस्ताव तीन दिवसांच्या आत निकाली काढण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गट विकास अधिकारी यांना दिल्या. जिल्ह्यातील पाणी टंचाईचा आढावा घेण्यासाठी दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे यांच्यासह सर्व उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.





पाणी टंचाई निवारण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या उपाययोजनांची गतिमान अंमलबजावणी होण्यासाठी उपविभागीय महसूल अधिकारी यांना विहिरींचे अधिग्रहण, टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे गटविकास अधिकारी यांच्यामार्फत येणाऱ्या प्रस्तावांची पडताळणी करून हे प्रस्ताव तीन दिवसांत निकाली काढणे आवश्यक आहे. तसेच तहसीलदार, गट विकास अधिकारी यांनी क्षेत्रीय पाहणी करून नियमितपणे पाणी टंचाईचा आढावा घ्यावा. दर आठवड्याला प्रत्येक उपविभागीय महसूल अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पाणी टंचाई आणि त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेवून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करावा, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

सिंचन प्रकल्पातील गाळ उपशासाठी 'मिशन मोड'वर काम करावे

सध्या जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पातील पाणीसाठा कमी झाला असल्याने या प्रकल्पातील गाळ उपसा करण्यासाठी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मृद व जलसंधारण विभाग, लघु पाटबंधारे विभागाच्या समन्वयाने सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा. उपविभागीय महसूल अधिकारी यांनी सातत्याने आढावा घेवून आवश्यक कार्यवाही करावी. येत्या आठवड्यात प्रत्येक उपविभागीय अधिकारी यांनी व्यापक स्वरुपात ही मोहीम राबवून अधिकाधिक गाळ उपसा होईल, यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

'माझा जिल्हा, हरित जिल्हा' उपक्रमासाठी सूक्ष्म नियोजन करावे

येत्या पावसाळ्यात जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवड आणि संवर्धन करण्यासाठी 'माझा जिल्हा, हरित जिल्हा' उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक तालुकास्तरावर सूक्ष्म नियोजन करून वृक्ष लागवडीसाठी स्थळ निश्चिती, रोपांची निवड करावी. शिक्षण विभागानेही यामध्ये पुढाकार घेवून शाळानिहाय वृक्ष लागवडीचे नियोजन तयार करावे. गाळ उपसा करण्यात येणाऱ्या प्रत्येक सिंचन प्रकल्पाच्या परिसरात संबंधित विभाग, स्वयंसेवी संस्थांनी वृक्षारोपण करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच प्रत्येक तालुक्यात टेकडी, डोंगर परिसरात वृक्षारोपण करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, असे त्यांनी सांगितले.

विहीर पुनर्भरण, रुफ टॉप रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी विशेष प्रयत्न करावेत

आगामी काळात पाणी टंचाईची समस्या दूर करण्यासाठी भूजल पुनर्भरणासाठी विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे. विशेषतः विहीर पुनर्भरण, रुफ टॉप रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या माध्यमातून शहरी आणि ग्रामीण भागातही भूजल पुनर्भरणासाठी क्लस्टर स्वरुपात मोहीम हाती घेणे गरजेचे आहे. कृषि विभागाने प्रत्येक तालुक्यामध्ये विहीर पुनर्भरण उपक्रमासाठी व्यापक स्वरुपात कामे हाती घ्यावीत. या कामांचा दर आठवड्याला आढावा घेवून त्याबाबत अवगत करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

जल जीवन मिशनच्या कामांना गती देण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे

जिल्ह्यात जल जीवन मिशनची काही कामे संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. या कामांना गती देण्यासाठी संबंधित तालुकास्तरीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. या कामांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या किंवा कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्याविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांच्या विहिरींवर सोलर पंप बसविण्याच्या अनुषंगाने नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

## संपादकीय....

# सोसणे-सोकावणे

वार्षिक सहासात टक्क्यांच्या गतीने वाढणारी आपली अर्थव्यवस्था आव्हानांशी दोन हात करण्यासाठी सक्षम असतानाही रिझर्व्ह बँक इतका निधी केंद्राकडे का देते हा प्रश्न आहे.जगातील बहुतांश मध्यवर्ती बँका तोट्यात असताना भारताची मध्यवर्ती रिझर्व्ह बँक आपल्या मालकास, म्हणजे केंद्र सरकारला, दोन लाख कोटी रुपयांहून अधिक लाभांश देते यातून रिझर्व्ह बँकेची नफा कमावण्याची क्षमता तसेच केंद्र सरकारची गरज या दोन्हींचे दर्शन होते. रिझर्व्ह बँकेचा हा विक्रमी लाभांश. त्यासाठी बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांचे अभिनंदन करावे तितके थोडे. आपल्या पालकांस अधिकाधिक कमावून देणे हे कोणत्याही पाल्याचे कर्तव्यच असते. ते चोख पार पाडत असल्याबद्दल दास यांचे अभिनंदन. त्यांच्या काळात केंद्राची विक्रमी कमाई झाली. व्यक्ती असो वा व्यवस्था. अनपेक्षित धनलाभ हा सर्वांनाच आनंददायी असतो. केंद्र सरकारला सध्या हा आनंद घेता येत असेल. कारण आपणास एक लाख कोटी रुपये मिळतील अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात रिझर्व्ह बँकेने अपेक्षित रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक निधी केंद्राच्या झोळीत घातला. विद्यामान सरकारच्या काळात रिझर्व्ह बँकेने पालक सरकारला किती किती निधी दिला, हे पाहणे उद्बोधक ठरावे. या रकमेत कधी, कशी वाढ झाली हेही यावरून कळेल. विद्यामान सरकार सत्तेवर आल्यानंतर एकाच वर्षात ६५,८९६ कोटी रु. (२०१५), ६५,८७५ कोटी रु. (२०१६), ३०,६५९ कोटी रु. (२०१७), ५० हजार कोटी रु. (२०१८), एक लाख ७५ हजार ९८८ कोटी रु. (२०१९), ५७,१२८ कोटी रु. (२०२०), ९९,१२२ कोटी रु. (२०२१), ३०,३०७ कोटी रु. (२०२२), ८७,४१६ कोटी रु. (२०२३) आणि यंदा थेट दोन लाख १० हजार ८७४ कोटी रु. म्हणजे गेल्या अवघ्या नऊ वर्षांत एकट्या रिझर्व्ह बँकेने केंद्रास आठ कोटी ७३ लाख २६६ कोटी रु. इतका लाभांश दिला. वास्तविक केंद्रास पैसा पुरवठा करणे हे काही रिझर्व्ह बँकेचे कर्तव्य नाही. पण तरीही असा निधी रिझर्व्ह बँकेकडून केंद्रास दिला जातो. तो मुळात दिला जावा का आणि द्यावयाचा असेल तर किती, हा यातील कळीचा मुद्दा आहे आणि त्यावर अर्थतज्ज्ञांचे एकमत नाही. हा निधी म्हणजे रिझर्व्ह बँकेने देशातील सरकारी बँकांसाठी राखलेला 'संकटकाळी बाहेर जाण्याचा मार्ग' असतो. त्यावर सरकारी मालकी असते हे खरे असले तरी तो देशातील बँकांसाठी आणीबाणीच्या परिस्थितीत हाताळण्यासाठी ठेवलेला असतो. उदाहरणार्थ धरणातील पाणी व्यापक हितासाठी जनतेच्या वापरासाठीच असते हे खरे असले तरी ते एका विशिष्ट पातळीच्या खाली गेल्यास वापरायचे नसते. अशा पाणसाठ्यास मृत साठा (डेड स्टॉक) असे म्हणतात. सरकारच्या पदरात दोन लाख कोटी रुपये एकगठ्ठा घातल्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीतील निधी आता मृत साठ्याच्या पातळीपर्यंत घसरला किंवा काय हे पाहावे लागेल. असे कमावत्यासाठी गमावण्याची वेळ मुळात रिझर्व्ह बँकेवर का आली? सध्या निवडणुका सुरू आहेत. पूर्ण अर्थसंकल्प यंदा अजून मांडावयाचा आहे. कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी निवडणुकीच्या वर्षात जरा चार पैसे अधिक खर्च करावे लागतात. निवडणुकीआधी खतावरील अनुदान वाढवावे लागते अथवा गरिबांसाठी मोफत अन्नधान्य योजना लांबवण्याची घोषणा करावी लागते. यामुळे वित्तीय तूट वाढते. अशा वेळी मिळेल त्या मार्गाने उत्पन्नात वाढ होत असेल तर तीस कोण नको म्हणेल हे उघड आहे. सरकारी मालकीच्या संस्थांच्या नफ्यावर आणि तसा तो मिळाल्यास लाभांशावर प्रत्येक सरकारचा डोळा असतो. सरकार पैसा उभा करण्याचे नवनवीन मार्गही शोधत असते. सार्वजनिक उपक्रमांकडून लाभांश वसूल करणे हा एक त्यातील मार्ग. त्यामुळे विरोधी पक्षात असताना सरकारी उपक्रमांच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे सत्ता हाती आल्यावर याच उपक्रमांतून चार पैसे कसे मिळवता येतील याचाच विचार करतात. यातूनच रिझर्व्ह बँकेकडून लाभांश आणि अतिरिक्त निधी वळवण्याचा प्रयत्न सातत्याने होत असतो. यात फरक इतकाच की बँकेच्या अधिकारांबाबत जागरूक असणारे आणि पाठीचा कणा शाबूत असणारे रिझर्व्ह बँकेचे काही गव्हर्नर यास विरोध करतात तर काही संपूर्ण शरणागतीत कमीपणा न मानणारे सरकारला हवे ते हव्या तितक्या आकारात देत राहतात. या दोहोंत विद्यामान गव्हर्नर शक्तिकांत दास यांचा समावेश कोणत्या गटात होतो हे ज्याचे त्याने ठरवावे. याआधी डी. सुब्बाराव, वाय. व्ही. रेड्डी, रघुराम राजन आणि ऊर्जित पटेल हे माजी गव्हर्नर तसेच विरल आचार्य यांच्यासारखा डेप्युटी गव्हर्नर अशा सगळ्यांनी इतका मोठा निधी केंद्राहाती देण्यास विरोध केला होता, यातच काय ते आले.तथापि दास यांनी जे औदार्य दाखवले ते आणि ज्यांच्यासाठी दाखवले ते, हे दोन्ही सरकारी आहे आणि म्हणून जनतेचे आहे. म्हणून त्याचा हिशेब मागणे आपले कर्तव्य ठरते. रिझर्व्ह बँकेने आपल्या कमाईतील किती वाटा केंद्रास द्यावा हे निश्चित करण्यासाठी रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर बिमल जालान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. रिझर्व्ह बँकेच्या भांडवलाच्या ५.५ ते ६.५ टक्के इतका निधी राखीव ठेवला जावा, असे या समितीचे म्हणणे. यातील पडत्या फळाची आज्ञा लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेने खालचा निकष विचारात घेतला आणि जास्तीत जास्त निधी सरकारकडे वर्ग करता येईल अशी व्यवस्था केली. तत्त्वत: सरकारने आपल्या अखत्यारीतील संस्थांकडून निधी वसूल करणे यात वावगे काही नाही.

# प्रधानसेवक, चौकीदार आणि आता परमात्मा का दूत

अलौकिक व्यक्तिमत्त्व पृथ्वीवर अवतीर्ण होतात, पण ती इथल्या मोहमायेच्या पलीकडे असतात. अखिल ब्रह्मांडाची चिंता वाहणाऱ्या या व्यक्तिमत्त्वांना त्यातील एखाद्या बिंदुएवढ्या ग्रहावरच्या घडामोडींत गुंतून पडणं शक्यच नसतं तर झालं असं की या पृथ्वी नामक ग्रहावरच्या भारतनामे देशात निवडणुकीची धामधूम सुरू आहे, हे तर आपण जाणताच. या भारतातलं एक छोटंसं नगर- पुरी. कृष्ण भक्तांच्या मनात या शहराला अद्वितीय स्थान. या पुरी मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवणारे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार संबित पात्रा यांच्या एका विधानाने देशभर खळबळ माजली विधान असं होतं की साक्षात जगन्नाथ म्हणजेच कृष्ण हे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भक्त आहेत टीकेची झोड उठताच पात्रांनी मी चुकून म्हणालो, वगैरे स्पष्टीकरण दिलं. तीन दिवस उपवास करून प्रायश्चित्त घेणार असल्याचंही जाहीर केलं, मात्र विरोधक काही अद्याप हा मुद्दा सोडण्यास तयार नाहीत. सोडतील तरी कसा? दिवस-रात्र टीव्ही वाहिन्यांवर राईचा पर्वत करणारा नेता असा कचाट्यात सापडल्यावर विरोधक त्याला सोडणे कठीणच. पण संबित पात्रांची जिभ खरोखरच चुकून घसरली असावी, यावर विश्वास ठेवला, तरीही मोदींच्या अलौकिक असण्याचा दावा दुर्लक्ष करण्याजोगा नाही. कारण याआधी भाजपच्या अनेक नेत्यांनी मोदींना देवस्थानी ठेवलं आहे. आता तर खुद्द नरेंद्र मोदींनाही, तसा अनुभव येऊ लागल्याचं, त्यांनी स्वतःच एका मुलाखतीत सांगितलं आहे.मोदींच्या पंतप्रधानपदाच्या कालावधीत त्यांच्या देवत्वाविषयी कोण काय म्हणालं ते पाहूया २६ मार्च २०१६ रोजी तत्कालीन केंद्रीय मंत्री व्यंकय्या नायडूंनी मोदींचं वर्णन देवाने भारताला दिलेली भेट या शब्दांत केलं होतं. ते गरिबांचे मसीहा आहेत, असं सांगत त्यांनी मोदींवर स्तुती सुमनांचा वर्षाव केला होता. नायडूंच्या या वक्तव्याची री त्याच्या पुढच्याच महिन्यात एप्रिल २०१६मध्ये तत्कालीन केंद्रीय कृषिमंत्री राधामोहन सिंग यांनी ओढली. त्यांनीही मोदी ही भारताला लाभलेली देवाची देणगी आहेत, असं म्हटलं. ऑक्टोबर २०१८मध्ये भाजपचे प्रवक्ते अवधुत वाघ यांनी एक ट्वीट केलं होतं. त्याचा आशय असा की, मोदी हे विष्णुचा ११वा अवतार आहेत. देशाला देवासारखे पंतप्रधान लाभले आहेत. मध्यप्रदेशचे कृषिमंत्री कमल पटेल यांनी जानेवारी २०२२मध्ये म्हटलं होतं की जगात कृष्णकृत्य वाढली की देव मानवी अवतार धारण करून पृथ्वीवर जन्म घेतो. राम व कृष्णही असेच अवतार होते. काँग्रेसच्या काळात भ्रष्टाचार, जातीभेद वाढला, देशाच्या संस्कृतीवर घाला घातला गेला त्यामुळे मोदींच्या रूपाने देवानेच पृथ्वीवर अवतार धारण केला आहे. संबित पात्रांप्रमाणेच वादग्रस्त वक्तव्यांसाठी ओळखल्या जाणत्या अभिनेत्री कंगना रानौत यांनी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये प्रवेश केला आणि लगोलग मंडीतून खासदारकीसाठीचं तिकीटही मिळवलं. ३ एप्रिल २०२४ रोजी प्रचारादरम्यान त्यांनी म्हटलं की मोदी हे राम आणि विष्णुचा अंश आहेत.ही झाली केवळ वक्तव्य, पण देव म्हटला की त्याचं मंदिरही हवंच. ही अटही मोदींबाबत पूर्ण झाली. गुजरातमध्ये अहमदाबादजवळ मोदींचं मंदिर बांधण्यात आलं होतं. २०१६मध्ये तब्बल सात लाख रुपये खर्च करून ओम ट्रस्ट नावाच्या संस्थेने हे मंदिर उभारल्याची वृत्तं प्रसिद्ध झाली होती. माझी मंदिरं बांधण्याऐवजी स्वच्छ भारत अभियानात योगदान द्या, असं आवाहन त्यावेळी मोदींनी केलं होतं. तरी डिसेंबर २०१९मध्ये तमिळनाडूतील तिरुचिरापल्लीपासून काही किलोमीटरवर असलेल्या येरकुडी गावातल्या पी. शंकर यांनी आपल्या शेतात मोदींचं मंदिर बांधल्याची वृत्तं प्रसारित झाली.

राम मंदिर- बाबरी मशीद हा वाद तर एकोणीसाव्या शतकापासून सुरू आहे. त्यासाठी देशभरातील अनेकांनी आयुष्यभर लढा दिला. विविध राजकीय पक्ष आणि संघटनांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. अखेर जानेवारी २०२४ मध्ये जेव्हा राममंदिरात श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली, तेव्हा मोदीजी रामलला को लेके आये असा प्रचार मोदींच्या समर्थकांनी व्हायरल गाणी, मीम्सच्या माध्यमातून केला. मोदी बाल श्रीरामाला बोट धरून मंदिराच्या दिशेने निघाल्याची चित्र प्रसारित केली गेली. अयोध्येच्या रस्त्यांवर अशी अवाढव्य कटाउट्स लावली गेल्याची छायाचित्र त्याकाळात प्रसिद्ध झाली होती.

भारत आजही भावनांवर चालणारा देश आहे. खेळाडू असो वा अभिनेता, त्यांची मंदिरं बांधल्याची, पूजा केल्याची उदाहरणं जागोजागी आढळतात. चाहते, अनुयायी, समर्थक असं करतातच. त्यामुळे त्याविषयी फार चिंता करण्याची गरज नसते. मोदींचे अनुयायीही स्वतःला मोदी भक्त म्हणतात, तर त्यांचे विरोधक त्यांना अंधभक्त म्हणून हिणवतात. राजकारणात असं प्रतिमासंवर्धन आणि अशी प्रतिमाभंजन सामान्य आहेत.



जोवर नेता स्वतः स्वतःबद्दल असे काही दावे करत नाही, तोवर या बाबी फार गांभीर्याने घेण्याची गरज नसते. पण जेव्हा सर्वोच्च पदावरची व्यक्ती स्वतःच असे दावे करू लागते, तेव्हा मात्र ते दुर्लक्ष करण्यासारखे नसतात.मोदींनी लोकसभा निवडणुकीचे शेवटचे दोन टप्पे शिल्लक असताना एका टीव्ही वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत आपल्याला परमात्म्याने काही विशेष कार्य करण्यासाठी पाठवलं असल्याचा विश्वास व्यक्त केला आणि अनेकांच्या भुवया उंचावल्या. आई जिवंत होती तोवर आपण बायोलॉजिकली जन्माला आलो आहोत, असं वाटत होतं, मात्र तिच्या निधनानंतर आणि मला येणारे अनुभव पाहता, आता माझा यावर विश्वास बसला आहे की मला परमात्म्याने पाठवलं आहे. माझ्यात जी ऊर्जा आहे ती कोणत्याही जैविक शरीरात असू शकत नाही. त्याआधी ३० एप्रिल रोजी महाराष्ट्रात लातूरमध्ये झालेल्या सभेत त्यांनी म्हटलं होतं की 'भगवानने मुझे मॅन्युफॅक्चर किया तब मेरे दिमाग मे छोटा चिप लगायाही नही, बडा चिप ही लगाया' भारतीयच काय जगभरातील जवळपास प्रत्येक संस्कृतीत देवाला सर्वोच्च स्थान आहे. त्याच्या वर कोणीही नाही. त्याचा प्रतिवाद होऊ शकत नाही. त्याला प्रश्न विचारले जाऊ शकत नाहीत, त्याला पदावरून खाली उतरविण्याचा विचारही केला जाऊ शकत नाही आणि त्याच्यावर टीका तर होऊच शकत नाही. पंतप्रधानपदाबाबत असं म्हणता येत नाही. देवाने सर्वांना निर्माण केलं, अशी श्रद्धा बहुसंख्य भारतीयांच्या मनात आहे. पण लोकशाही ही मानवाने निर्माण केलेली व्यवस्था आहे, हे तर कोणीही मान्य करेल. पंतप्रधानपदही माणसानेच त्याच्या सोयीसाठी निर्माण केलं. या पदाभोवती एक खास वलय असतंच, त्याबद्दल वादच नाही. पण ती व्यक्ती जनतेला उत्तरदायी असते. तिला प्रश्न विचारले जाऊ शकतात, तिच्या निर्णयांवर- ध्येयधोरणांवर कायद्याची चौकट न ओलांडता टीका करण्याचं पूर्ण स्वातंत्र्य नागरिकांना असतं. भारतात ते आजवर होतं आणि आजही आहे. या पदावरच्या व्यक्तीला जाब विचारला जाऊ शकतो आणि पायउतार होण्यास भाग पाडलं जाऊ शकतं. देवाच्या बाबतीत अजिबात संभव नसलेल्या या सर्व कृती पंतप्रधानांच्या बाबतीत शक्य आहेत. पंतप्रधान देव किंवा देवाचा अंश किंवा देवाचे दूत असतील, साक्षात परमात्म्याने त्यांना पाठवलं असेल, तर हे सारं शक्य होईल का? की या सर्व शक्यताच पुसून टाकण्यासाठी हे अंश, दूत, अवताराचं कथानक रचलं जात आहे?आचारसंहितेच्या काळात धार्मिक आधारावर मतं मागू नयेत, तसं केल्यास कारवाई होऊ शकते वगैरे आता केवळ अंधःश्रद्धा वाटू लागल्या आहेत. त्यामुळे पंतप्रधानांनी स्वतःला परमात्म्याचा दूत म्हटल्यामुळे आचारसंहितेचं उल्लंघन झालं वगैरे दावे फोलच ठरतात. पण मुद्दा हा आहे की देश का चौकीदार आणि प्रधानसेवक अशा स्वतःच स्वतःला बहाल केलेल्या बिरुदांपासून सुरुवात करणारे नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्यासाठी परमात्म्याचा दूत किंवा अंश म्हणून स्वतःला जनतेपुढे सादर करू पाहत आहेत का? मोदींच्या दाव्यात तथ्य असेल, तर रातोरात लादलेल्या नोटाबंदीमुळे झालेले हाल, कोविडमध्या वैद्यकीय सुविधांअभावी झालेले मृत्यू, मणिपूरमधला अद्यापही पुरता न शमलेला हिंसाचार, महिला कुस्तीगिरांच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष, चीनच्या अतिक्रमणाकडे डोळेझाक, टोकाच्या ध्रुवीकरणामुळे भरडली जाणारी कुटुंब, महागाई, बेरोजगारी, गरिबी माध्यम स्वातंत्र्यापासून आनंदी नागरिकांपर्यंत विविध जागतिक निर्देशकांवर घसरत जाणारी देशाची कामगिरी ही सारी देवाची इच्छा आहे, असं त्यांना म्हणायचं का? १४० कोटी भारतीयांनी 'असेल माझा हरी' म्हणत देव मोदींना कधी आदेश देणार आणि या समस्या कधी दूर होणार याची वाट पाहत बसणं अपेक्षित आहे का? मोदीजी जर परमात्म्याचे दूत असतील, तर ते कोणत्याही पदावर नसतानाही केवळ आपल्या प्रभावाने देशातल्या सर्व समस्या चुटकीसरशी दूर करू शकतात. सकाळ-संध्याकाळ प्रचारसभा घेऊन मंगळसूत्रापासून म्हशीपर्यंत काय-काय हिसकावून घेतलं जाईल, हे सांगून मतदारांना घाबरविण्याऐवजी परमात्म्याला साकडं घालून या सर्वांचं रक्षण करू शकतात. कपील सिब्बल यांनी तर त्यांना प्रत्येक भारतीयाच्या खात्यात लगोलग १५ लाख रुपये ट्रान्स्फर करून टाकण्याची विनंतीही केली आहे.असो मोदींची आश्वासनं, धोरणं, योजना, भाषणं, जाहीरनामा इत्यादी पाहून तर कधी कधी ते खरंच परमात्म्याचा दूत असावेत, असा भास होऊ लागतो. कारण तसं नसतं, तर त्यांना थेट २०४७ पर्यंतची दूरदृष्टी कशी लाभली असती? पंतप्रधानपदी सलग एक दशक विराजमान असलेल्या व्यक्तीने खरंतर आपण केलेल्या कामांच्या मुद्यावर मतं मागणं अपेक्षित असतं. पण लौकिक जगातले नियम अशा अलौकिक व्यक्तिमत्त्वाला कसे लागू पडतील?

# विदर्भाचे नेते विदर्भाच्या प्रश्नांवरच बोलत नाहीत

नागपूर शहराला राज्याच्या उपराजधानीचा दर्जा देण्यात आला. पण येथील जनतेला आणि विदर्भाला दशकांपासून हक्क व सन्मान कधीच मिळाला नाही. विदर्भाचे शोषण करून पुणे-मुंबई, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर पुढे गेले आणि नागपूरसह विदर्भ मागे राहिला. देशाच्या आणि राज्याच्या राजकारणावर पक्की पकड असणारे नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरचे आहेत. ते अनेक दशकांपासून सक्रिय राजकारणात आहेत. तरीही उपराजधानी वर्षानुवर्षे दुर्लक्षित आहे. प्रत्येक वेळा विषय मांडल्यानंतर विदर्भाला आश्वासन दिले जाते. ते पूर्ण होत नाही.





याआधी राज्यात पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांची सत्ता असताना विदर्भावर अन्याय झाला, मात्र आता विदर्भाची प्रत्येक समस्या समजून घेणारे नेते सत्तेत असतानाही विदर्भावर होत असलेल्या अन्यायावर बोलत नाहीत हा चिंतेचा विषय आहे. विदर्भाच्या जनतेने या नेत्यांना हवे ते दिले आणि दोन्ही नेते पंतप्रधान झाले पाहिजेत, अशा शुभेच्छा पण देतात. अगोदर शेतकरी आत्महत्या हा मोठा मुद्दा होता. त्या तर थांबल्या नाहीत, आता लहान व्यापारी आत्महत्या का करतो? त्यांचे लहान व्यवसाय मोठे उद्योगपती हळूहळू गिळंकृत करीत चालले आहेत. सामाजिक असमानता वाढत चालली आहे. यामुळे शहरात गुन्हेगारीही वाढत आहे. पण याचा वरील नेते कोणत्याही व्यासपीठावरून उल्लेख करीत नाही. सर्व निर्णय घेण्याचे अधिकार आणि सर्व विभाग मुंबईत असल्यामुळे संपूर्ण विदर्भाचा औद्योगिक व कृषी क्षेत्राचा विकास अनेक दशकांपासून रखडला आहे. विभागाचे अधिकार सुद्धा मुंबईला घेऊन गेले. एमआयडीसी आणि इतर विभाग हे याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. विदर्भातील नेते प्रत्येक वेळी निवडणुकीत विदर्भ विकासाचा मुद्दा उचलतात आणि आश्वासन देऊन निवडणुका जिंकतात. पण सत्तेत येताच, प्राधान्य मुंबई आणि पुण्याला देतात. त्यामुळे नागपूरला उपराजधानीचा दर्जा काही कामाचा नाही हे स्पष्टपणे दिसून येते. विदर्भातील नैसर्गिक संसाधने विदर्भाच्या विकासाच्या कामी यावी आणि २५ लाख तरुणांना नोकरी देण्याची क्षमता निर्माण होऊन विदर्भ सुद्धा समृद्ध व्हावा हा विषय येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मुख्य मुद्दा झालाच पाहिजे, त्रासलेल्या लोकांच्या सहनशक्तीची अधिक परीक्षा नको यासाठी प्रत्येक विभागासाठी एक मिनी मंत्रालय नागपुरात असावे, मुंबईच्या फेऱ्या मारून लोक थकतात आणि त्यांची हिंमत खचते. महत्त्वाच्या खात्यांची मिनी मंत्रालये पूर्ण अधिकारांसह नागपूरमध्ये किंवा विदर्भात असणे आता गरजेचे झाले आहे. महाराष्ट्राला नंबर वन ठेवण्यात विदर्भाचे योगदान नेते पूर्णपणे विसरले आहेत. विदर्भात निर्माण होणाऱ्या विजेशिवाय मुंबईत उद्योग वाढलेच नसते. पण त्यांनी वीजनिर्मितीमुळे विदर्भात निर्माण होणाऱ्या प्रदूषण आणि पर्यावरण ऱ्हासाचा विचारच कधी केला नाही. आता विदर्भात प्रदूषण नको आणि येथील पाणी शेतकरी व उद्योगांना दिले तर विदर्भाला काही वेगळे दिले नाही, तरी आपली वीज मिळणारच आहे हे ल क्षात घ्यायला हवे. गुजरात राज्याने आपल्या समुद्रतटावर मोठे वीज प्रकल्प सुरू केले आहेत तसेच महाराष्ट्रात कोकणाच्या समुद्रकिनाऱ्यावर वीज प्रकल्प सुरू केल्यास सतत होणारी वीजवहन आणि वितरण (टी ण्ड डी लॉस) हानी कमी होईल, याचा विचार होणे गरजेचे आहे. मुंबईचे बंदर ही पुणे, नाशिक, मुंबईची ताकद आहे. तशीच कोळसा, वीज आणि खनिज विदर्भाची ताकद आहे. विदर्भातील बेरोजगार युवकांचा यावर पहिला हक्क आहे. कोळसा आणि कमी दरात वीज विदर्भाला हवी तेवढी मिळाली पाहिजे. हा निर्णय झाल्याशिवाय विदर्भात मोठे उद्योगधंदे येणार नाहीत. छत्तीसगडने विजेचे दर कमी करून दशकापासून थांबलेल्या औद्योगिकरणाला गती दिली आणि आज एक समृद्ध राज्य झाले आहे. सर्व सिंचन प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत म्हणून पाटबंधारे विभागाने विदर्भ सिंचन विकास महामंडळाची (व्हीआयडीसी) स्थापना केली आणि त्याचे मुख्यालय नागपुरात ठेवण्यात आले. परंतु एकही प्रकल्प वेळेत पूर्ण झाला नाही. वीजनिर्मितीसाठी विदर्भात भरपूर पाणी आहे आणि उपमुख्यमंत्री नवीन वीज प्रकल्प आणण्यास इच्छुक आहेत. पण १०० टक्के सिंचन पूर्ण कधी होईल, हा प्रश्न कायम आहे. शेतकरी आत्महत्या, तांदूळ निर्यातीवर होणारा वाईट परिणाम, कमकुवत अर्थव्यवस्था, वाढती बेरोजगारी यासारख्या संवेदनशील प्रश्नांचाही नेत्यांना सत्तेत येताच विसर पडतो. आता पाटबंधारे विभागाला योग्य अधिकार व अंदाजपत्रक देऊन खासदार व आमदारांनी मासिक आढावा घेऊन सर्व प्रकल्प लवकर पूर्ण होऊन शंभर टक्के शेतकऱ्यांना वेळेवर पाणी मिळावे याची दक्षता घ्यावी.संपूर्ण अधिकार असलेले उद्योग व खनिज मंत्रालयाचे एक कार्यालय नागपुरात असावे, कारण हा विषय विदर्भासाठी अत्यंत संवेदनशील आहे. उपमुख्यमंत्र्यांनी अनेक आश्वासने देऊनही अद्याप खाण धोरण तयार झाले नाही. त्यामुळे एमएसएमईची वाढ खुंटली असून, लहान-मोठ्या खाणींशी संबंधित सर्व समस्या तातडीने सोडवणे आवश्यक आहे. खनिज धोरणासह खाणकाम वाढवणे ग्रामीण रोजगारासाठी आवश्यक आहे. आशा आहे की गडकरी आणि फडणवीस याकडे लक्ष देतील.नागपूर ही उपराजधानी असतानाही उद्योग विभागाच्या अंतर्गत येणारे सर्व विभाग विदर्भाला सावत्र वागणूक देत असल्याने अनेकांनी कंटाळून उद्योग बंद केले. कारण त्यांना छोट्या-छोट्या गोष्टींसाठी मुंबईला जावे लागत आहे. यामुळे उद्योजक त्रस्त आहेत. काही महिन्यांपूर्वी राज्याचे उद्योगमंत्री आणि मुख्यमंत्री दावोसला जाऊन आले. तेथे मोठ्या संख्येत करार झाले. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही काही मोठे करार केले. माध्यमांमध्ये याची भरपूर चर्चा झाली. पण आतापर्यंत एकही प्रकल्प आला नाही. दावोसहून परतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी स्वतः हे प्रकल्प ६ महिन्यात बांधकाम सुरू करतील, असे सांगितले होते. दर महिन्याला आढावा बैठक नागपुरात घेऊन अडचणी सोडवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे कारण विदर्भाची ३ कोटी जनता फक्त शेतीवर जगू शकत नाही.

प्रत्येक विभागात सक्षम अधिकारी आहेत. पण त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असला पाहिजे. नागपुरात जिल्हा उद्योग केंद्र आणि उद्योग सहसंचालक कार्यालयात कर्मचारी आणि वाहनांची कमतरता आहे तशीच परिस्थिती विदर्भाच्या अन्य जिल्ह्यात आहे. उपमुख्यमंत्र्यांनी यात हस्तक्षेप करून उद्योग मंत्रालय व त्याअंतर्गत येणारे विभाग मजबूत करावेत.

विदर्भातील कोळसा, पाणी, सिमेंट आणि विजेमुळे संपूर्ण महाराष्ट्र देशात अव्वल स्थानी असल्याचे नेते अभिमानाने सांगतात. पण अनेक दशके विदर्भाचा हक्क मारून ही स्थिती निर्माण झाली हे ते विसरतात. अत्यंत हुशारीने मुंबई आणि पुण्यातील उद्योगांची अडचण होऊ नये म्हणून त्यांना विदर्भात तयार होणारी वीज उपलब्ध करून देतात व विदर्भातील वीज विदर्भाच्या उद्योगांना अत्यंत महागड्या दरात देऊन औद्योगिकीकरणाला खीळ घातली जाते. हा अतिशय गंभीर विषय आहे. राजकीय नेत्यांनी या मुद्यावर मौन तोडून लोकांना न्याय द्यावा. गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विविध राज्यांमधे स्पर्धा वाढली आहे. पुणे, मुंबईचे मोठे उद्योग समूह ओडिशा, उत्तरप्रदेश आणि तमिळनाडूमध्ये जात आहे. त्यांना नागपूरमध्ये आणण्याचे प्रयत्न होताना दिसत नाही.प्रशासनाकडे पाहिले तर सर्वात मोठे अधिकारी नागपुरात विभागीय आयुक्त आहेत. तसेच सर्व युवा जिल्हाधिकारी विदर्भाला लाभलेले आहेत. पण सत्तेचे केंद्र मुंबईत आहे, त्यामुळे त्यांना गतीने काम करता येत नाही. त्यामुळे अनेक अधिकाऱ्यांना विदर्भातील त्यांची नियुक्ती शिक्षा वाटते. त्यामुळे राजधानी आणि उपराजधानीतील अंतर कमी करणे अत्यंत गरजेचे आहे. कार्यक्षम अधिकारी नागपुरात आणल्यास हे अंतर कमी होऊ शकते. आज उपराजधानी आणि विदर्भ एवढा महसूल देऊनही विकासाच्या क्षेत्रात मागे आहे. काही दशकात पुणे, नाशिक आणि औरंगाबादचे औद्योगिकीकरण झाले. पण क्षमता आणि संसाधने असूनही नागपूर आणि विदर्भाला हक्क आणि सन्मान देण्याऐवजी दुर्लक्षित का ठेवले याचे उत्तर देण्याची वेळ आली आहे. बदल हा निसर्गाचा नियम असून आता उपराजधानीला योग्य हक्क व सन्मान मिळायला हवा. आज विदर्भ आपली संसाधने, प्रतिभा, स्थान, पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी आणि वीज यांच्या आधारे १० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि २५ लाख लोकांना रोजगार देण्यास सक्षम आहे.

# दिल्लीपर्यंत यायला पैसे नाहीत... पद्मश्री.... पोस्टाने पाठवा साहेब !



(शिक्षण फक्त तिसरी पास... नक्कीच वाचा...)
ज्यांच्या नावापुढं कधीच कुणी श्री लावलं नव्हतं, ज्याच्याकडे संपत्ती म्हणून काय होते तर कपड्याचे फक्त तीन जोड, तुटलेली एक रबरी चप्पल, एक जुनाट चष्मा आणि रोख ७३२ रुपये फक्त ! त्याला जेव्हा चक्क पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला तेव्हा त्यांनी सरकारला कळवलं की, दिल्ली पर्यंत यायला पैसे नाहीत पद्मश्री.... पोस्टाने पाठवा साहेब ! अजब आणि अफाट आहे न हे ? मी सत्यकथा सांगतोय ओडिशातील हलधर नाग या अवलियाची. कोसली भाषेत कविता लिहिणारे प्रसिद्ध कवी, कहर म्हणजे त्यांनी आजवर जितक्या कविता आणि वीस महाकाव्य लिहिली आहेत ते सर्व त्यांना तोंडपाठ आहे. आणि आता तर संभलपूर विश्वविद्यालयात त्यांच्या हलधर ग्रंथावली – भाग –२ याचा पाठयक्रमात समावेश करण्यात आलाय. साधाच वेष, शक्यतो पांढर धोतर, गळ्यात गमछा आणि बहुतेक वेळा अनवाणी फिरणारे हलधर एक अफलातून अवलिया आहेत . हि खरे तर इंडियन आयडॉल आहेत. पण कचकड्याच्या दुनियेतील रियालिटी शो मधल्याना आपले चॅनेलवाले हिरो करतात. आयडॉल ठरवतात. खरे आयडॉल तर हलधर जी सारखे आहेत. चॅनेलवाल्याचे यांच्याकडे लक्ष कधी गेले तर याना पद्मश्री जाहीर झाल्यावर ! श्री हलधर जी याची जीवनकहाणी तुम्हालाही प्रेरणा देऊन जाईल. म्हणून तर हि पोस्ट करतोय. ते एका अत्यंत गरीब हरिजन कुटुंबातून आलेले, आईवडिलांचे निधन झाल्याने वयाच्या दहाव्याच वर्षी हलधर जी अनाथ झाले. त्यामुळे त्यांना इयत्ता तिसरीतच शाळा सोडवि लागली. पोटासाठी इतक्या लहान वयात ते ढाब्यावर खरकटी भांडी विसळण्याचे काम करू लागले. त्यानंतर एका गृहस्थाला त्याची दया आली व यांना एका शाळेच्या स्वयंपाक घरात काम मिळाले. तिथं थोडं स्थिरस्थावर आयुष्य त्यांना मिळालं. नंतर बँकेकडून त्यांनी शंभर रुपये कर्ज घेऊन पेन – पेन्सिल – शालेय वस्तूच्या विक्रीचे छोटेसे दुकान टाकले. आणि उदरनिर्वाह त्यातूनच भागवू लागले. आता त्यांच्यातील साहित्यिक कौशल्याबद्दल सांगतो. श्री हलधर जी यांनी १९९५ च्या सुमारास स्थानिक उडिया भाषेत राम शबरी सारखे काही धार्मिक प्रसंग निवडून त्यावर स्फुट लिहून ते लोकांना ऐकवू लागले. भावनेने ओथंबलेले त्यांचे ते शब्द ऐकताना लोक गुंग होऊन जायचे. पाहता पाहता त्यांच्या रचना प्रचंड लोकप्रिय झाल्या. हळूहळू ती कीर्ती सर्वदूर पसरू लागली. अनेक नामांकित लेखक कवींनी त्यांची दखल घेऊन विविध वृत्तपत्रातून त्यांच्याबद्दल भरभरून लिहिले. आणि अखेर दिल्लीपर्यंत त्यांची हि कीर्ती पोचली आणि त्यांना चक्क साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला. अजून एक कहर म्हणजे स्वतः हलधर जी फक्त तिसरी पर्यत शिकलेलं पण आजमितीस पाच पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी त्यांच्या साहित्यावर पीएचडी करत आहेत. त्यांच्याबद्दल इतकंच म्हणावसं वाटत की, आप किताबो में प्रकृति को चुनते है पद्मश्री ने, प्रकृति से किताबे चुनी है।। डीडी क्लास : भोवती अनुकूल काहीच नसतानाही यश खेचून आणणारे, दगडालाही फोडून त्यातून बाहेर उगवून येणारे हलधर जी सारख्या लोकांची चरित्रे का वाचायची ? तर आपल्यात, आपल्या पुढच्या पिढीत त्यातूनच ऊर्जा यावी. सगळी परिस्थिती वाईट आहे. नाहीतर मी नक्कीच काहीतरी करून दाखवलं असत अशी कारणे देऊन निराश झालेल्यासाठीच हि आजची हलधर जी याची कहाणी तुम्हांपुढे ठेवली. शेवटी मी नेहमी सांगतो तेच आज पुन्हा सांगतो, काहीही होवो..... रडायच नाही तर लढायच आणि लढून जिंकायच...

# समाज एकता अभियान कडून साडी वाटप



अकोला :– अकोला परिसरातील कळंबेश्वर येथे बुद्ध जयंतीनिमित्त समाज एकता अभियाना द्वारे मा. विनोद विरघट सर यांच्या कडून साड्यांचे वाटप करण्यात आले.

समाज एकता अभियान महाराष्ट्रात सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय सहकार्य करून आंबेडकरवादी समाजाचे सामाजिक ऐक्य करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. समाज एकता अभियाना द्वारे सामाजिक बांधिलकी जोपासुन शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय सहकार्यासाठी मा. विनोद विरघट सर सतत प्रयत्न शिल असतात. समाजातील घटक एकत्र येऊन वैचारिक प्रबोधन व्हायला पाहिजे व समाजाला आपले काही देणे आहे ते आपण द्यायला पाहिजे या भावनेतून बुद्ध जयंतीनिमित्त साडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला बहुजन समाजातील अनेक महिला उपस्थिती होत्या. समाज एकता अभियान द्वारे मा. विनोद विरघट सरांनी आजपर्यंत अनेक सामाजिक कामे करून समाजामध्ये सकारात्मक उर्जा भरण्याचे काम केले आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचनालय, वेगवेगळ्या रुग्णांना आर्थिक सहकार्य, तसेच इतरही अनेक सामाजिक कार्यात मा. विनोद विरघट सरांनी सढळ हाताने दान देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर जगण्याचा प्रयत्न करत आहेत. मा. विनोद विरघट सरांच्या माध्यमातून आज पर्यंत अनेक गरजु लोकांना खुप मोठा आधार मिळालेला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कमवणाऱ्या लोकांना संदेश दिला होता की आपल्या कमाईतील विसावा भाग अर्थात पाच टक्के वाटा समाजाच्या कल्याणासाठी खर्च करावा. मा. विनोद विरघट सर या पेक्षा ही जास्त खर्च करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाचे पालन करतात. समाज एकता अभियानाला सर्वोतोपरी सहकार्य करून समाज एकता अभियान महाराष्ट्रभर लोकांपर्यंत पोहचवण्यामध्ये मा. विनोद विरघट सरांचे खुप मोठे योगदान आहे. बुद्ध जयंती निमित्ताने साडी वाटपाच्या कार्याक्रमाला कळंबेश्वर येथील अनेक महिला तर समाज एकता अभियाना कडून मा. विनोद विरघट सरांच्या आई शांताबाई प्रल्हादराव विरघट, रवि अढाव, मा. विनोद विरघट सर, सुमेध घनबहादुर सर उपस्थित होते.

# ग्रामीण टी–१० स्पर्धेच्या उपांत्य फेरीत 'काँटों की टक्कर'

## गतविजेता रेणापूर, लातूर शहर उपांत्य फेरीत दाखल; उदगीर, अहमदपूर संघातही संघर्षपूर्ण लढती




लातूर प्रतिनिधी – लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिपच्या तिस–या पर्वातील महाविजेता होण्यासाठी ४ संघ (दि.२४) शुक्रवारी उपांत्यफेरीत एकमेकांशी भिडणार आहेत. गतविजेता रेणापूर आणि लातूर शहर संघासह अहमदपूर विरुद्ध शिरुर अनंतपाळ आणि उदगीर विरुद्ध निलंगा यांच्यातील विजयी संघात 'काँटो की टक्कर' अनुभवायला मिळणार आहे. अंतिम सामन्यात कोण एकमेकांशी भिडेल आणि तिस–या पर्वातील महाविजेता कोण होणार, याची क्रीडारसिकांत उत्सुकता आहे. लातूर क्रीडा संकुल येथे सुरु असलेल्या लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप ग्रामीण टी १० स्पर्धेत आज (दि.२३) गतविजेत्या रेणापूर संघाने चाकूर संघाला हरवत उपांत्य फेरीत शानदार प्रवेश केला आहे. आकाश आडे ५१(१८) आणि सचिन पवार ५०(२१) यांच्या अर्धशतकीय खेळीने रेणापूरने विजयाला गवसणी घातली आहे. दुस–या सामन्यात लातूर शहर संघाने लोहाविरुद्ध मोठा विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली आहे. उपांत्यफेरीसाठी सुरु असलेल्या अहमदपूर विरुद्ध शिरुर अनंतपाळ आणि उदगीर विरुद्ध निलंगा संघांतही रोमांचक लढती सुरु आहेत. लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिपच्या पहिल्या उपांत्यफेरीसाठी झालेल्या सामन्यात गतविजेत्या रेणापूर संघाचे चाकूर संघाचा ८ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. ग्रामीण टी १० च्या मागील हंगामात तिस–या स्थानी असलेल्या चाकूर संघाने या हंगामातही चांगला खेळ केला. पहिल्यांदा फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या चाकूर संघाने १० षटकात ९ गडी गमावत ११२ धावा केल्या. सचिन पाटील ५०(२१), तिरुपती राठोड २७(१२) यांनी चाकूरचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. नवनाथ वाकडे यांनी २ षटकात ६ धावा देत २ बळी घेऊन चाकूर संघावर दबाव निर्माण करण्यात यश मिळवले. त्यानंतर फलंदाजीला उतरलेल्या रेणापूरने आकाश आडे ५१(१८) आणि सचिन पवार ५०(२१) यांच्या अर्धशतकीय खेळीच्या बळावर उपांत्य फेरीत दिमाखदार प्रवेश केला. आकाश आडे सामनावीर ठरला. दुस–या उपांत्य फेरीसाठी सुरु असलेल्या सामन्यात लातूर शहर संघाने लोहा–कंधार संघाविरुद्ध शानदार खेळ करीत उपांत्य गाठली आहे. लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप ग्रामीण टी१० स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी झालेल्या लोहा–कंधार संघाने पहिल्यांदा फलंदाजी करीत ८.४ षटकात सर्वबाद ६४ धावांचे माफक आव्हान लातूर शहर संघाला दिले. लातूर शहर संघाकडून सलीम शेख यांनी हॅटट्रीक केली. त्यांनी १.४ षटके निर्धाव टाकत ४ बळी घेतले. मुहम्मद यांनी २ षटकात ३ बळी घेत सलीम शेख याला चांगली साथ दिली. सलीम शेख सामनावीर ठरला. लातूर शहर संघाने ५ गडी गमावत विजय साकार केला. लोहा–कंधार संघाने सामना गमावला असला तरी गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात चांगली कामगिरी करीत क्रिकेटरसिकांचे मने जिंकली. उपांत्य फेरीतील सामने आज (दि.२४) शुक्रवारी लातूर क्रीडा संकुल येथे पहिल्या उपांत्य सामन्यात रेणापूर संघाची गाठ उदगीर विरुद्ध निलंगा सामन्यातील विजयी संघाशी तर लातूर शहर संघाची गाठ अहमदपूर विरुद्ध शिरुर अनंतपाळ यांच्यातील विजयी संघाशी होणार आहे. शिरुर अनंतपाळ संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला असून दोन्ही संघाच अटीतटीचा सामना सुरु आहे.

# प्रमाणिक पणा आणि प्रवासी यांच्या बरोबर सौजन्याने वागावे, महिला रिक्षा चालक : अनिता चौधरी यांचे सर्वत्र कौतुक



नवी मुंबई / के. एच. हनवते :– व्यसन करू नये, प्रवासी यांचे विसरलेले मौल्यवान सामान प्रमाणिक पणे परत देणे हे श्री दिलीप किसनराव आमले आपला माणूस अध्यक्ष शिव वाहतूक सेना नवी मुंबई नेहमी सांगतात त्याप्रमाणे आज प्रामाणिक महिला पदाधिकारी सौ. अनिता आप्पासाहेब चौधरी (महिला रिक्षा चालक ) हे दररोजच्या प्रमाणे रिक्षा व्यवसाय करत असताना सेक्टर ८ वरून नेरूळ रेल्वे स्टेशन कडे पॅसेंजर घेऊन जाता वेळी त्यांना गावदेवी चौकामध्ये रस्त्यावर पडलेला महागडा मोबाईल दिसला त्या मोबाईल वरून दुसरी गाडी जाण्याची शक्यता होती म्हणून त्यांनी तो मोबाईल उचलला व आपल्याकडे ठेवला नेरूळ रेल्वे स्टेशनला भाडं उतरल्याच्या नंतर त्या तात्काळ आपला माणूस वाहतूक सेवा मध्यवर्ती कार्यालय श्री दिलीप किसनराव आमले यांच्याकडे जात होत्या परंतु त्यांना लगेच चेंबुर येथील प्रवासी लागले त्याच वेळेस त्यांना त्या मोबाईल वरती फोन आला त्यांना तो महागडा मोबाईल रिसीव्हर करताआला नाही परंतु थोड्यावेळाने पुन्हा मोबाईल आल्यावर उचलला व त्यांना सांगितले मोबाईल रस्त्यावर पडला होता तो वाहतूक कार्यालयामध्ये जमा करत आहे परंतु त्यांनी सांगितले मोबाईल आमच्याकडे दिला तरी चालेल मी माझ्या मुलाला किंवा मुलीला पाठवतो मी पोलीस कर्मचारी फडतरे बोलतोय सदर फोन चेंबुरवरून आल्यानंतर गावदेवी चौका मध्ये त्यांची मुलगी आली व सदर मोबाईल अनिता चौधरी यांना तो मोबाईल परत दिला त्यांनी आमच्या प्रामाणिक महिला रिक्षाचालक सौ. अनिता चौधरी यांचे एवढं कौतुक केलं की अशी डॅशिंग महिला त्यांचा जवळजवळ ७०–८० हजाराचा मोबाईल काही सेकंदामध्ये जर त्यांनी उचलला नसता तर त्याचं वरून गाडी गेली असती त्या मोबाईल चा चुराडा झाला असता आणि तो पूर्ण पणे फेकून द्यायचा झाला असता परंतु या प्रमाणिक आदर्श महिलांयानी रस्त्यावर पडलेला महागडा मोबाईल त्यांना परत दिला त्यांचे सर्वत्र अभिनंदन कौतुक होते आहे. लवकरच नेरूळ पोलीस स्टेशनच्या वतीने व नवी मुंबई आरटीओ च्या वतीने त्यांचा सन्मान होणार आहे शिव वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष श्री दिलीप किस्नराव आमले यांनी या प्रामाणिक महिला पदाधिकारी याचा आदर्श सर्व रिक्षा चालक यांनी घेवा.

# नवी मुंबई नेरूळ नगरीत पहिल्यांदाच सर्वधर्म प्रचारकांना सोबत घेऊन बुद्ध जयंती उत्साहात साजरी






नवी मुंबई / के. एच. हनवते : दिघा – ऐरोली, नेरूळ, पनवेल, उलवे येथील सर्व धर्म मानव प्रेमी नागरिकांनी एकत्रित येऊन वैशाख बुद्ध पौर्णिमा तथागत भगवंत गौतम बुद्ध जयंती महोत्सव नेरूळ येथील रामलीला मैदानात सर्व नवी मुंबईतील जाती धर्म पंथाच्या नागरिकांनी एकत्रीत येऊन ऐतिहासिक अशी धम्मक्रांती जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमास जागतिक कीर्तीचे पूज्य भदन्त विमलकित्ती गुणसिरी ( संस्थापक मदनाम शक्यमुनी विजयासन बुद्धिस्ट सेमिनरी अध्यक्ष ), यांचे अथक प्रयत्नातून नागपुर नंतर नवी मुंबईत पहिल्यांदाच सर्व जाती धर्म पंथाना एकत्री करून वैशाख बुद्ध पौर्णिमेनिमित्त बुद्ध जयंती महोत्सव साजरा करण्यात अला. सदर कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून मा. डॉक्टर महेश देवकर ( पाली विभाग प्रमुख सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे ), मा. एजाज सरगरोह ( विश्वस्त नूर मज्ञिद वाशी ) मा. फादर डॉक्टर मायकल रोशारिओ (होली चर्च वसई), मा. मधुकर म्हात्रे ( सामाजिक कार्यकर्ते ), मा. प्रा. संजय सूर्यवंशी ( सामाजिक कार्यकर्ते धुळे ), मा. ज्ञानी गुरविंदर सिंग ( प्रमुख ग्रंथी गुरुद्वारा श्री गुरुसिंह सभा खारघर ), मा. सुरेश सावंत ( संविधान प्रचारक ), डॉक्टर सौ. निता गंगावणे ( श्रामणेर बौद्धाचार्यनी ), इत्यादी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार झाला पाहीजे तथागत भगवंत गौतम बुद्ध हे केवळ एका जातीचे नसुन ते विश्वातील समस्त मानवाच्या दु:खमुक्तीचा मार्ग शोधुन जनकल्याणाचा मध्यम मार्ग सांगीतला त्यांची जयंती हि आपन सर नागरिकांनी एकत्र येऊन साजरी केली पाहीजे आसे पुज्य भदन्त विमकित्ती गुणसिरी यांनी उपस्थितांना धम्मदेशना दिली. या प्रसंगी महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी – साहित्यिक व विचारवंत मा. श्री. उत्तम दासू तरकसे आसरडोहकर यांनी उपस्थित मान्यवरांना शाहीची नोंद पुस्तिका देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास ( धम्मसेवकस) मा. संतोष कुषलवर्धन, ( धम्म सेवक ) मनोज राजपक्ष, ( सामाजिक कार्यकर्ते ) चंद्रकांत जगताप, (सामाजिक कार्यकर्ते ) एल, आर, गायकवाड, (सामाजिक कार्यकर्ते ) भास्कर पवार, ( समाजसेवक ) विरेंद्र लगाडे, ( धम्मसेवक ) प्रकाश डबरासे, ( नेरुळ जयंती उत्सव समीतीचे अध्यक्ष ) उत्तम कांबळे, (समाजसेवक ) चंद्रकांत कांबळे, (समाजसेवक) संजय गायकवाड इत्यादी कार्यकर्ते धम्म उपासक – उपासिका यांनी तन मन धनानी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी केला. सदर कार्यक्रमात ( दैनिक महावृत्त ) पत्रकार : कल्याणराव एच. हनवते यांनी जयंती विशेषांक मोफत वाटप करून धम्माचा प्रचार आणि प्रसार केला. सदर या कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन सौ. प्रतिभा बादली यांनी सुंदर प्रकारे केले व कार्यक्रम समितीचे अध्यक्ष म्हणून मा. जागेस सोमवार यांनी योग्य पद्धतीने आपली जबाबदारी पार पाडली सदर कार्यक्रम रामलीला मैदानातील प्रांगणात खूप मोठ्या प्रमाणात सर्व प्रकारच्या पुस्तक विक्रीचे स्टॉल लावण्यात आले होते तसेच कासार फाउंडेशन च्या वतीने काही बुद्धतत्त्वज्ञानाची पुस्तके ही मोफत वाटप करण्यात आली. सदर कार्यक्रमास हजारोच्या संख्येने नवी मुंबई दिघा ऐरोली ते पनवेल, उलवे विभागातील सर्व नागरिक सर्व जाती धर्म पंथाचे सुज्ञ व जाणकार नागरिक हजर होते. कार्यक्रमाच्या शेवटी धम्मपालन व सरणत्तय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत ३ ठार




टेंभूर्णी : प्रतिनिधी पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शिराळ (टें) हद्दीत पुण्याहून येणा–या अज्ञात वाहनाने मोटारसायकल स्वारास पाठीमागून जोरदार धडक दिली. यामध्ये मोटार सायकलवरील तिघांचा मृत्यू झाला. ही घटना २३ मे रोजी (गुरुवार) रात्री १२ वाजण्याच्या सुमारास हॉटेल जय मल्हारच्या समोर घडली आहे.

या अपघातातील मृत तिघेजण मोहोळ तालुक्यातील असून यात मावस बहीण–भाऊ व जावेचा समावेश आहे. या अपघाताने तीन कुटुंबांवर मोठा आघात झाला आहे. महादेव रमेश ताकमोगे (वय २२, रा. देगांव, ता. मोहोळ) सध्या रा. टेंभुर्णी, एमआयडीसी, महानंदा विकास पवार (वय ४५) सुषमा प्रकाश पवार (वय ४०) दोघी रा. देगांव ता. मोहोळ अशी मृतांची नावे आहेत. सदर दुचाकीचालक शिराळ (टें) हद्दीतील हॉटेल जयमल्हारच्या समोर आले असता त्यांना पुण्याहून आलेल्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली.या अपघातात महादेव रमेश ताकमोगे व सुषमा पवार हे दोघे जागीच ठार झाले तर महानंदा यांना टेंभुर्णी येथील खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना तपासणी करून डॉक्टरांनी मृत घोषित केले. या अपघाताविषयी फिर्याद महादेव दत्तात्रय जाधव (३८) रा. एकरुके ता. मोहोळ यांनी दिली आहे. टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे हे करीत आहेत.

# बालवयात घरात संस्कार केले जातात- पूज्य भदंत बोधानंद थेरो

मुंबई :- घराघरात प्रथम संस्कार हे आई वडिलांकडून नकळत होत असतात, त्यांची त्यांना कल्पना नसते.वडील मुलांना सांगतात कधीच खोटे बोलू नये.पण एका मित्राला व भिक्कुला काही पैसे देणे असतात.तेव्हा ते कॉल करतात. प्रथम वडील कॉल घेतात आणि सांगतात मी बाहेर आहे एक तासाने कॉल करा. एक तासाने भिख्खू कॉल करतात,वडील मुलाला सांगतात त्यांना सांग वडील घरी नाहीत असे वडिलांनी सांगितले, मुलगा पण वडिलांनी जे सांगीतले तेच सांगतो.भंतेजी वडिलांनी सांगीतले की वडील घरी नाही असे सांग.हे संस्कार घरातुन मुलावर लहानणापासूनच होत असतात. ते जसं जसे समजदार होतात तसं तसा त्या मुलात बदल होत जातो.म्हणूनच वयाच्या आठव्या ते बारा वर्षा पर्यंत मुलावर धम्माचे योग्य संस्कार होणे आवश्यक असते.असे पुज्य भंते बोधानंद थेरो यांनी वैसाक बुद्ध पौर्णिमा निमित्त धम्म देशना देतांना सांगीतले.

सिद्धार्थ फाऊडेशन मुंबई च्यावतीने दरवर्षी दहा दिवसीय बाळ श्रामनेर शिबिर पूज्य भदंत बोधानंद थेरो यांच्या नेतृत्वाखाली रत्नबोधी बुद्ध विहार कन्नमवार नगर विक्रोळी येथे आयोजित करण्यात येते. त्यांचा सांगता समारोह करतांना पूज्य भंते बोधानंद थेरो बोलत होते.या वर्षी ऑन लाईन नांव नोंदणी करण्यात आली होती त्यात ९६ मुलांनी नांव नोंदणी केली होती. पण जागे अभावी ५६ मुलांना श्रामनेर शिबिरात प्रवेश देण्यात आला होता.

संस्कार कसे होतात त्यांची दोन ठळक उदाहरण त्यांनी सांगीतले.आईवडील कष्ट, त्याग करून मुलांना शिकवतात. त्यामुळेच



त्यामुलाला चांगली नोकरी मिळते.त्यांच्यासाठी कर्ज काढून घर घेऊन ठेवतात. मुलांचे लग्न करून देतात. लग्न झाल्यावर एका वर्षात सासू सुनेचं पटत नाही. आईवडील म्हातारे होतात. ते विसर भोळे होतात. स्वभावात बदल होतो. तो सुनेला सहन होत नाही. मुलगा दिवस भर कामा निमित्त बाहेर असतो.संध्याकाळी घरी आल्यावर त्याला दोन्ही कडून वेगवेगळे ऐकायला मिळते. सून म्हणते यांना बाहेर वृद्धाश्रमात नेऊन सोडा नाही तर मी घर सोडून जाते. दुसऱ्या दिवशी मुलगा पाटी घेऊन येतो तेव्हा मुलाचे मुल विचारात बाबा ही पाटी कशाला आणली?. तेंव्हा तो सांगतो आजी आजोबा ला चालता येत नाही म्हणून त्यांना डोक्यावर घेऊन जाण्यासाठी आणली. त्यावेळी मुलाचा मुलगा म्हणतो बाबा त्यांना सोडल्यावर ते पाटी घरी घेऊन येजा. कारण तुम्हाला सोडायला आम्हाला पाटी लागेलंना हेचं संस्कार मुलांवर होत असतात.दुसरे उदाहरण श्रीलंका,थायलंड,ब्रम्हा,अमेरिका इंग्लंड या देशात रोड खाली असला तरी कोणी स्पीड वाढवून पुढे जात नाही. किंवा रोड खाली असला तरी सिग्नल तोडून कोणी जात नाही. कारण त्या देशातील नागरिकांवर तसे संस्कार झालेले असतात.मी सिग्नल तोडून गेलो तर मागचे लोकं काय म्हणतील ही त्यांना भिती असते. आपल्या कडे कोणालाच कशाची भिती वाटत नाही. यासाठी बुद्धाच्या धम्माचे संघाचे संस्कार होणे आवश्यक आहे. हे काम गेली पांच वर्षी करत आहे. त्याला अनेक जागरूक धम्म उपासक उपासिका हितचिंतक यांचे आर्थिक शारिक सामाजिक योगदान लाभत असते. एड प्रमोद सागर तायडे यांनी दहा दिवस पिण्याचे पाणी पुरविले. दहा दिवशीय श्रामनेर शिबिरात भन्ते महानाम,भन्ते पूर्ण,भन्ते अश्वजित,भन्ते विजयानंद,हे बाळ श्रामनेर भन्ते यांची खूप काळजी घेतात,प्रवीण रुपवते कुटुंब आणि सुधाकर त्रिभुवन,अशोक घोक्षे,रोहित प्रवीण रूपवते,तेजस्विनी प्रवीण रूपवते, अनिकेत प्रवीण रूपवते,मनीष खोबरगडे,लक्ष्मण बालाजी गवळी,राहुल सुनील गावडे,राशी अनिल मिसाळ,प्रांजल विपुल हीरे,राज संतोष खरात,अक्षय राजू मगरे,युवणी कैलाश कडवे,आशीष भानुदास कांबळे,आशुतोष विजय भडारे,आर्यन विजय भंडारे,आर्यन शरद त्रिभुवन,चैतराली राजेश धाबडे यांनी दहा दिवस श्रामणेर शिबिरार्थींना सेवा दिली.

# बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार, रिठा शिवारातील घटना?



किनवट : प्रतिनिधी. (शेख शौकत) बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एक गाय ठार झाल्याची घटना दि.२२ मे रोजी रिठा तांडा शिवारात घडली आहे. शेतकरी उमेश जाधव यांची ही गाय होती अशी माहिती आहे. रिठा तांडा येथील रहिवासी असलेले शेतकरी उमेश देविसीग जाधव यांची पांढरी गाय दि. २१ मे रोजी हरवली होती सदरील हरवलेल्या गाईचा शोध या शेतकऱ्याने शिवारात घेतला परंतु त्यांना ती गाय सापडली नाही. दि. २२ मे रोजी रिठा तांडा शिवारातील एका शेतात बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार झाल्याचे आढळून आले. या घटनेबाबत शेतकऱ्यांनी ईस्लापूर वनविभागाला माहिती देताच वनपाल सोनाळे, वनरक्षक अंकुश पडोळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृत गाईची पाहणी करून पंचनामा केला आहे. मृत गाय ही उमेश जाधव यांची दुधाळ गाय होती. त्यामुळे सदरील या शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने वनविभागाकडून शेतकऱ्यास मदत देण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतन होत आहे.

# नाल्यावरील बंधारे गाळात रुतले कोट्यवधींचा खर्च गेला मातीत, कामे निकृष्ट दर्जाचे



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) शासनाकडून गेल्या अनेक वर्षात किनवट माहूर तालुक्यातील छोट्या-मोठ्या नाल्यावर सिमेंटचे बंधारे बांधण्यात आले अनेक बंधाऱ्यांना गेट न बसवता बांधण्यात आल्याने पाणी आडवा पाणी जिरवाच्या मूळ उद्देशाला हरताळ फासला गेल्याचे चित्र किनवट माहूर तालुक्यात निर्माण झाले असून सर्वच बंधारे गाळात रुतले तर काही बंधारे फुटून गेल्याने शासनाने हरितक्रांती घडविण्याच्या उद्देशाने दिलेल्या निधी दोन्ही तालुक्यातील अधिकारी पदाधिकाऱ्यांनी आपल्या घशात घातलेला दिसत आहे अनेक ठिकाणी सुरू असलेली कामही दर्जाहीन होत असल्याची ओरड होत आहे. किनवट माहूर तालुक्यात शेकडो छोटे मोठे नाल्या असून या नाल्यावर गेल्या दहा ते पंधरा वर्षात शेकड शेकडो बंधारे बांधण्यात आले हे बंधारे अनेक ठिकाणी दहा मीटर पेक्षा रुंद असल्याने त्यावर एखादा लोखंडी गेट बसविण्यात आला तर अनेक ठिकाणी बांधण्यात आले अनेक ठिकाणी बसविलेले गेट चोरांनी लांबी दिल्याने ह्या बंधाऱ्यावर झालेल्या लाखो चा खर्च पाण्यात वाहून गेला असून ज्या ठिकाणी पाण्यासाठी पाणी जाण्यासाठी वाट जागा न ठेवल्याने या सिमेंटच्या बंधाऱ्यात गाळ बसल्याने हे बंधारे ही गाळात रुतले शासनाकडून जिल्हा परिषद, जलसंधारण विभाग, पाटबंधारे विभाग, लघु पाटबंधारे विभाग, कृषी विभागाचे गॅबियन सिमेंट बंधारे, किनवट माहूर तालुक्यात शेकडो बंधाऱ्यासाठी निधी देण्यात आला. परंतु माहूर तालुक्यात या विभागाचे कार्यालयाचे नसल्याने अधिकारी या डिपार्टमेंटने बांधले त्या डिपार्टमेंटने बांधले म्हणून ढकलाढकली करत वेळ मारून नेत पदाधिकाऱ्याकडून होत असलेल्या कामात बनवाबनवी करून कामे उरकून बिले उचलून घेतात त्यामुळे काम कोणी केले किती रुपयांचे काम आहे याचे कुठेही फलक न लावता कामे करण्यात येत असल्याने स्थानिक पुढारी मंडळी ही यात सामील राहत असल्याने शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या निधीची अंदाजपत्रकांनुसार कामे न करता विल्हेवाट लावली जात असल्याने किनवट - माहूर तालुक्यात कोट्यावधीचा निधी पदाधिकाऱ्यांच्या घशात जात असून गावोगावी पाटबंधारे विभागाकडून सुरु असलेली सध्याची कामे दर्जाहीन होत असल्याची ओरडत असून संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देणे गरजेचे असून या कामाकडे लक्ष न दिल्यास दिसून येत आहे.५ लाख ३० ते ४० लाखाच्या , निधीची कामे निकृष्ट दर्जाची होऊन तीही गाळात ऋततील यात शंका आहे.

# बुद्ध गार्डन कोल्हापूर येथे वैशाखी बुद्ध जयंती साजरी करण्यात आली.

कोल्हापूर/प्रतिनिधी : तथागत गौतम बुध्द यांचा धम्म व फुले,शाहू,आंबेडकर यांचे मानवतावादी विचार समाजामध्ये पोहचविण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर समाजबांधवानी एकत्रितपणे जयंती उत्सव साजरे केले पाहिजेत.आज प्रत्येक गाव गड्यामध्ये कमी अधिक प्रमाणात जयंती उत्सव साजरे होत आहेत. आज बहुजन समाजाला बुध्द धम्म आणि बाबासाहेब यांचा विचार पटत आहे. त्यामुळे आपण सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळीमध्ये मध्यवर्ती जयंती समितीच्या माध्यमातून एकत्रितपणे काम करण्याची अवश्यकता आहे असे मत मध्यवर्ती जयंती समितीचे अध्यक्ष प्रेमानंद मौर्य यांनी व्यक्त केले. बुध्द गार्डन संवर्धन विकास संघाच्या वतीने तथागत गौतम बुध्द यांच्या २५६८ वी जयंती शास्त्रीनगर येथील बुध्द गार्डन येथे साजरी करण्यात आली यावेळी झालेल्या कार्यक्रमात प्रेमानंद मौर्य बोलत होते. यावेळी बोलतांना मौर्य म्हणाले, संपूर्ण जगामध्ये बौध्द बांधव सक्रीय झाले आहेत.बुध्दांच्या व बाबासाहेबांच्या विचाराशिवाय पर्याय नाही.पुढच्या काळामध्ये बुध्दांचा विचार समाजामध्ये पोहचविण्यासाठी वाचन संस्कृती वृध्दीगंत केली पाहिजे. यावेळी डॉ. धुमाळे, डी.जी.भास्कर,देवदास बानकर,संजय गुदगे,उषा गंवडी,अनिता गवळी मॅडम आदिंनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीस डॉ.अरुण धुमाळे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहन करण्यात आले त्यानंतर सामुदायिक बुध्द वंदना व त्रिशरण,पंचशील ग्रहण करण्यात आले. दीपप्रज्वलन प्रेमानंद मौर्य यांच्या हस्ते तसेच प्रतिमेस डी. जी. भास्कर यांच्या हस्ते पुष्प आर्पण करण्यात आले.



यावेळी बुध्द गार्डन संवर्धन विकास संघाचे अध्यक्ष सुखदेव बुध्याळकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.यावेळी रघुनाथ मांडरे, दयानंद शेडगे, रमेश कांबळे, विलास भास्कर, अजय डोंगरे, सौरभ बुध्याळकर, पंकज आठवले, प्रविण बनसोडे, सुरेश नागटिळे, संतोष हिरवे, संजय कांबळे, वैभव प्रधान, नामदेव कोथळीकर, सुकुमार कोठावळे, नामदेव माने, के. टी. सडोलीकर,अनिता समुद्रे,शोभा बुध्याळकर, ज्योती बुध्याळकर, उज्वला चंदनशिवे,पूनम बानकर,ज्योती आठवले,कविता महाजन नागटिळे,ज्योति डोंगरे,मीना कांबळे,वैशाली लिंगनूरकर आदिसह उपासक उपासिका मोठ्या संख्येनी उपस्थित होते. बुद्ध गार्डन कोल्हापूर येथे वैशाखी बुद्ध जयंती साजरी करण्यात आली.बानकर साहेब यांनी आपले परखडपणे विचार मांडून बौद्ध बांधवांना बुद्ध जयंतीच्या मंगल कामना दिल्या.

# वादळी पावसामुळे लाखोंचे नुकसान झालेल्या सावर्डे -डेरवण गावांना आमदार शेखर निकम यांची भेट

## तातडीने पंचनामा करून भरपाई देण्याचे आदेश



चिपळूण / प्रतिनिधी : चिपळूण तालुक्यातील सावर्डे सहित डेरवण या गावामध्ये काल झालेल्या तुफानी वादळी झालेल्या मुसळधार पाऊसामुळे ग्रामस्थांचे लाखोंचे नुकसान झाले आहे.

या वादळी पाऊसामुळे सावर्डे-डेरवण येथील दत्तमंदिर, धावडेवाडी, काजरकोन्ड, डेरावण रोड, गणेशवाडी येथील रस्त्यावरील व इतर ठिकाणी असलेली झाडे उनमळून पडली तसेच घरांवरील छपरे उडाली आणि त्यामुळे झाडांच्या निवाऱ्याखाली लावलेल्या दोनचाकी, चारचाकी गाड्यांवर झाडे पडल्यामुळे गाड्यांचे सुद्धा नुकसान झाले आहे.

ही बातमी कळताच, आमदार शेखर निकम यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ यांच्यासमवेत सर्व नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली. ग्रामस्थांकडून सर्व माहिती घेत सर्वाना धीर दिला याबाबत अधिकारी वर्गाला पंचनामे करण्यास सांगून तातडीने कार्यवाही करून लवकरात लवकर नुकसान भरपाई देणेबाबत आदेश दिले आणि महावितरण अधिकाऱ्यांस विद्युत पुरवठा सुरळीत करण्यास सांगितले व तहसीलदार, प्रांताधिकारी यांनासुद्धा दूरध्वनी संपर्क साधत याबाबत माहिती देत त्याच्याशी नुकसान भरापाईबाबत सविस्तर चर्चा केली.

यावेळी बाळुशेठ मोहिरे, सावर्डे गावाचे सरपंच जमीर मुल्लाजी, प्रकाश कानसे, सचिन बागवे, बाबू कातकर, पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जयक्रांती महाविद्यालयात जिल्हास्तरीय रासेयो अंकेक्षण शिबीर संपन्न




लातूर : येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती महाविद्यालयामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, नांदेड राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित लातूर जिल्ह्याचे अंकेक्षण शिबीर दिनांक २२ व २४ मे, २०२४ रोजी दोन दिवशीय शिबीर संपन्न झाले. या शिबिराची उद्घाटन संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, संचालक डॉ. मलिकार्जुन करजगी, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, प्राचार्य श्री प्रशांत घार, चार्टर्ट अकाउंटंट श्री. अमोल मुळे, विद्यापीठाचे अकॅडमी कौन्सिल मेंबर डॉ. नारायण कांबळे, जिल्हा समन्वयक डॉ. केशव आलगुले, यांची प्रमुख उपस्थिती होती. लातूर जिल्ह्यातील एकूण ५२ महाविद्यालयापैकी ३८ महाविद्यालयाने आपले ऑडिट करून घेतले. उर्वरित १४ महाविद्यालनी लवकरात लवकर आपल्या ऑडिट करून घेऊन विद्यापीठात सादर करावे असे आवाहन संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी यावेळी केले. सदरील शिबिर यशस्वी करण्यामध्ये दिव्यांश खेडकर, कृष्णा पांचाळ, कृष्णा ओणी, सुरज भोसले, अजय लामतुरे, यांनी परिश्रम घेतले. तसेच जयक्रांती महाविद्यालयातील कार्यालय प्रमुख डॉ रामेश्वर स्वामी, शिक्षकेतर कर्मचारी जाधव रामदास, विजय कनगुले,सचिन शिखरे, अमित भालके यांनी शिबीर यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# इयत्ता बारावी पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज नियमित शुल्कासह ७ जूनपर्यंत स्वीकारले जाणार

लातूर :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात इयत्ता बारावीच्या फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल २१ मे, २०२४ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट, २०२४ मध्ये घेण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र बारावी परीक्षेस पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेतंर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी, आयटीआय विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संसथेद्वारे ट्रान्सफर ऑफ क्रिडेट घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. इयत्ता बारावी पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने ु.ारहरहीीललेरीव.ळप या संकेतस्थळावर स्वीकारण्यास २७ मे २०२४ पासून प्रारंभ होणार असून नियमित शुल्कासह ७ जूनपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. विलंब शुल्कासह ८ जून, २०२४ ते १२ जून, २०२४ पर्यंत अर्ज स्वीकारले जातील. उच्च माध्यमिक शाळांनी, कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाची मुदत ३१ मे, २०२४ ते १५ जून, २०२४ पर्यंत आहे. तसेच उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यास याद्या जमा करावयाची तारीख १८ जून २०२४ पर्यंत राहील. परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यानी जुलै-ऑगस्ट, २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षेचे अर्ज त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामार्फतच भरावेत. उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन अर्ज भरताना फेब्रुवारी-मार्च, २०२४ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यंना, त्यांची या परीक्षेतील माहिती अर्जात ऑनलाईन घेता येईल. श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रुवारी - मार्च, २०२५ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा , कनिष्ठ महाविद्यालयांनी निर्धारित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्याच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात. अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नव्या तिकीट आरक्षण प्रणालीला प्रवाशांचा प्रतिसाद

लातूर : - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने १ जानेवारी, २०२४ पासून बस तिकिटासाठी ऑनलाईन आरक्षण प्रणाली अद्ययावत केली आहे. या आरक्षण प्रणालीला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून १ जानेवारी ते २० मे,२०२४ पर्यंत राज्यातील १२ लाख ९२ हजार तिकिटांची ऑनलाईन विक्री झाली आहे. गतवर्षी याच कालावधीत ९ लाख ७५ हजार तिकिटांची विक्री झाली होती. यंदा सुमारे ३ लाख अधिक तिकिटांची विक्री झाली आहे. नवीन या ऑनलाईन आरक्षण प्रणालीद्वारे राज्यात दररोज अंदाजे १० हजार तिकीटे काढली जात आहेत. प्रवाशांना घरबसल्या एसटीचे तिकिट उपलब्ध करुन देण्यासाठी एसटीने आपल्या ले या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन तिकीट आरक्षण करण्याची सोय केली आहे. तसेच भ्रमणध्वनीवर पच्या माध्यमातून देखील प्रवाशांना तिकीट काढता येते. या दोन्ही पध्दतीद्वारे तिकीट काढण्याच्या प्रणालीमध्ये १ जानेवारी, २०२४ पासून अमुलाग्र बदल करुन त्या अद्ययावत करण्यात आल्या. परिणामी त्यातील दोष दूर झाल्याने नवीन ऑनलाईन आरक्षण प्रणाली प्रवाशांना वापरण्यास अत्यंत सोपी व सुलभ झाली आहे. तसेच या दोन्ही प्रणालीद्वारे प्रवाशांना अमृत, जेष्ठ नागरिक, जेष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना, दिव्यांग व्यक्ती अशा विविध सवलतीचे देखील आगाऊ आरक्षण मिळत आहे. त्यासाठी महामंडळाने या अधिकृत संकेतस्थळाबरोबर पचा वापर प्रवाशांनी करावा, असे अवाहन केले आहे. ऑनलाईन आरक्षण करताना प्रवाशांना तांत्रिक अडचण आल्यास ७७३८०८७१०३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. हा नंबर प्रवाशांना तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी २४ तास सुरु असणार आहे. तसेच ऑनलाईन आरक्षण करताना पैसे भरुन देखील तिकीटे न येणे (पेमेंट गेट वे संदर्भात) या तक्रारींसाठी ०१२०-४४५६४५६ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, आवाहन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE